बृहन्मुंबई महानगरपालिका

# नियोजन विभाग

## जाहिरात

## समुदाय संघटक या पदाची कंत्राटी भरती

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जेंडर बजेटच्या महिला व बाल कल्याण योजनांच्या अंमलबजावणीसाठी ११ महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्त्वावर (ठोक मानधनावर) 'समुदाय संघटक' पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज स्वीकारण्याचा पत्ताः सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांचे कार्यालय, ५ वा मजला, जनता क्लॉथ मार्केट इमारत, हॉकर्स प्लाझा, सेनापती बापट मार्ग, दादर (प), मुंबई- ४०००२८.

अर्ज प्रत्यक्ष किंवा टपालाने स्वीकारण्यात येतील.

**अर्ज करण्याची अंतिम तारीख २८/०६/२०२२ आहे.**

रिक्त पदे भरावयाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्र. | पदनाम | पदांची संख्या | मासिक मानधन | वय | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | समुदाय संघटक | ११३ | रु.२०,०००/- प्रतिमाह | **खुल्या प्रवर्गाकरिता** १८ ते ३८ वर्ष **मागास प्रवर्गाकरिता** १८ ते ४३ वर्ष सुवर्ण जयंती योजना /दीनदयाळ अंत्योदय योजना काम केलेल्या उमेदवारांसाठी २ वर्षे शिथीलक्षम | १. निम्नतम शैक्षणिक अर्हताः कोणत्याही शाखेतील पदवी तथापी, समाजशास्त्र विषयातील पदवी (BA.Sociology) अथवा समाजकार्य विषयातील पदवी (BSW) असल्यास प्राधान्य देण्यात येईल.<br>२. सामाजिक क्षेत्रामध्ये स्वयंसेवी संस्थेमध्ये किमान २ वर्ष काम केल्याचा अनुभव आवश्यक.<br>३. शासकीय मान्यताप्राप्त संस्थेचे मराठी टंकलेखनाचे प्रति शब्द ३० व इंग्रजी टंकलेखनाचे प्रति शब्द ३० प्रमाणपत्रास प्राधान्य.<br>४. शासनाच्या नियमाप्रमाणे एम.एस.सी.आय.टी. (MSCIT) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक किंवा एम.एस.ऑफिस, पॉवर पॉईंट, वर्ड, एक्सेल यांचे ज्ञान आवश्यक. तथापी, संबंधित प्रमाणपत्र अनिवार्य.<br>५. मराठीचे ज्ञान आवश्यक |

वरील पदांसाठी सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांची संख्या, विहित अर्ज करण्याची पध्दत, शैक्षणिक अर्हता, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया व इतर महत्वाच्या सर्व सूचना इ. बाबतच्या सविस्तर तपशीलासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या **संकेतस्थळावरील उज्वल संधी करिता येथे क्लिक करावे - माहिती येथे क्लिक करावे - सर्व नोकरीच्या संधी येथे क्लिक करावे-समुदाय संघटक या पदाची भरती** येथे क्लिक करावे. येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे व सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

**सर्वसाधारण सूचनाः**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात अटी व शर्तीसह प्रसिध्द करण्यात येत आहे. उमेदवारांनी संकेतस्थळावरील जाहिरातीला अनुसरून जाहिरातीत नमूद अटी व शर्तीनुसार उपरोक्त नमूद पत्त्यावर आपले अर्ज सादर करावेत. अर्जाचा नमुना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

उमेदवाराने अर्ज सादर करणेपूर्वी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

सही/-

**सहाय्यक आयुक्त (नियोजन)**

पी.आर.ओ/५०२/जाहिरात/२०२२-२३

**येता कणकण तापाची, तपासणी करून घ्या रक्ताची.**